माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दतीची अंमलबजावणी.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांकः-एसएससी-२०१२/(१५४/१२)/उमाशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २१ एप्रिल, २०१५.

संदर्भ :- १) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे अ.शा. पत्र क्र.रामं/परिक्षा-५/३६५५, दि. २१ मे २००७.

२) शासन पत्र क्र.एसएससी-२००२/(१०४/०२)/उमाशि-२, दि. ४ जून २००७

३) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परिक्षा-५/३८७४, दि. १.७.२०११

४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएससी-२०११/(१६२/११)/उमाशि-२ दि. ३० नोव्हेंबर २०११

५) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परिक्षा-६/दि. १४.८.२०१२.

६) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे पत्र क्र.क्रीयुसे/खेक्रीगुण/४४१/१२ १३/१९३/का-४, दि. ३ जुलै, २०१३.

<u>प्रस्तावना :-</u>

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना परिक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास, त्यांना उत्तीर्ण होण्याच्या किमान मर्यादेपर्यंत क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण केवळ उत्तीर्ण होण्यासाठी देण्यास संदर्भाधीन दिनांक ३०/११/२०११ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असण्याच्या दृष्टीने राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ जाहीर करण्यात आले आहे. या धोरणातील शिफारस क्र. ३.१ ही खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव याविषयीची आहे. दिनांक ३०/११/२०११ च्या आदेशानुसार फक्त अनुत्तीर्ण होणा-या खेळाडूंनाच क्रीडा गुण सवलतीचा लाभ मिळत असून, खेळाबरोबरच अभ्यासक्रमातही प्रगती करणा-या खेळाडूंना डावलले जात असल्याची भावना होत होती.त्यामुळेच क्रीडा विभागाने क्रीडा धोरण समितीची उपरोक्त शिफारस मंत्रीमंडळासमोर ठेवली होती. समितीची शिफारस मंत्रीमंडळाने मान्य केली असून त्यानुसार क्रीडा गुण सवलतीचे सुधारीत आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परिक्षेस प्रविष्ट होणा-या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव २५ गुण देण्यासंदर्भातील सुधारित कार्यपद्धतीस शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर सुधारित कार्यपद्धती आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी प्रस्तावित केल्यानुसार परिशिष्ट “अ” मधील अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून क्रीडा सवलतीचे वाढीव गुण अनुज्ञेय राहतील.

२. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी सन २०१५-१६ या वर्षापासून करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१५०४२११४५०४९३०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: CN = Prakash Krishnrao Thube, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Joint Secretary
Date: 2015.05.13 10:42:41 +05'30'

**(प्रकाश ठुबे)**

**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) शिक्षण आयुक्त,महाराष्ट्र राज्य,पुणे
२) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) सर्व विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ.
६) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८) मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण), मंत्रालय, मुंबई.
९) मा. मुख्यमंत्र्याचे उपसचिव, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव.
११) मा. प्रधान सचिव (शा.शि. व क्री.वि.) यांचे स्वीय सहायक.
१२) उपसचिव (समन्वय), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती, उमाशि-२.

शासन निर्णय क्रमांक :- एसएससी-२०१२/(१५४/१२)/उमाशि-२

दिनांक :- २१ एप्रिल, २०१५ सोबतचे

## परिशिष्ट "अ"

(१) भारतीय शालेय खेळ महासंघ, भारतीय क्रीडा प्राधिकरण पुरस्कृत खेळ, महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत आयोजित सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप, जवाहरलाल नेहरू हॉकी कप, विनु मंकड, सी.के. नायडू केंद्र शासन मान्यताप्राप्त खेळ, भारतीय ऑलिंपिक व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनची संलग्नता असलेले एकविध खेळाच्या राज्य संघटनाहस्त आयोजित खेळ क्रीडा गुणासाठी ग्राह्य धरण्यात यावे.

(२) इ. १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांसाठी राज्य, राष्ट्रीयव आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा १ जून ते २८/२९ फेब्रुवारी हा कालावधी ग्राह्य धरण्यात यावा. परीक्षा संपल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या कोणत्याही क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना वाढीव क्रीडा गुणांची सवलत देण्यात येऊ नये.

(३) खेळाडू विद्यार्थी हा एकापेक्षा अधिक खेळात सहभागी झालेला असला तरीही त्याला त्याच्या उच्चतम एकाच खेळाच्या प्रमाणपत्राचे गुण ग्राह्य धरण्यात यावेत.

(४) खेळाडू विद्यार्थी ज्या जिल्ह्यामध्ये शिक्षण घेत आहे त्याच जिल्ह्याकडून त्याने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा. (ही अट मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे जिल्ह्यातील खेळाडू विद्यार्थ्यांच्या बाबतीत लागू होणार नाही.)

(५) एकविध खेळ क्रीडा संघंटनानी १४ वर्षावरील कोणत्याही २ वयोगटातच राज्य/राष्ट्रीय स्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित केलेल्या असाव्यात. (इ. १० वी व १२ वी साठी) खुल्या गटातील क्रीडा स्पर्धा वाढीव क्रीडा गुणासाठी ग्राह्य धरण्यात येऊ नयेत.

(६) शालेय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्रावीण्यप्राप्त खेळाडूंची यादी स्पर्धा संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत ज्या जिल्ह्यात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, त्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही करावी. सदर यादी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याबाबत क्रीडा उपसंचालक (मुख्यालय) यांनी नियंत्रण ठेवावे.

(७) अधिकृत राज्यसंघटनांनी आयोजित केलेल्या अधिकृत राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त खेळाडूंची यादी त्या त्या खेळाच्या राज्यसंघटनेने त्यांच्या अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने १५ दिवसांच्या आत राज्यसंघटनेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी व एक प्रत क्रीडा संचालनालयास सादर करावी.

(८) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ज्या खेळाडूंना वाढीव क्रीडा गुण दिलेले आहेत त्यांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी.

(९) राज्य संघटनांनी त्यांच्या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची माहिती स्पर्धा संपन्न झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत विहित नमुन्यामध्ये संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास दोन प्रतीत व एक प्रत क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावी. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सदर प्रस्तावाची छाननी करुन पुढील कार्यवाही करावी. यानंतरचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. (एकविध खेळाच्या राज्य/जिल्हा संघटनेने संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी

कार्यालयांना सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेली आहे.

(१०) राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्यानंतर खेळाडूने त्याचे अर्ज त्वरीत मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडे सादर करावा. मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी खेळाच्या अर्जाची शहानिशा करुन तो ७ दिवसात संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावा. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा गुणांचे प्रस्ताव त्या शैक्षणिक वर्षातील दिनांक ३० एप्रिल पर्यंत संबंधित विभागीय शिक्षण मंडळ यांच्या कार्यालयास सादर करावेत.

(११) राज्य संघटनेमार्फत आयोजित स्पर्धा या जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आयोजन करणे आवश्यक आहे.

(१२) संघटनेच्या जिल्हास्तरीय व विभागीय क्रीडा स्पर्धेची व जिल्हास्तरिय संघटनेच्या अधिकृततेबाबतच्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.

(१३) क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत ज्या खेळांना क्रीडा गुण द्यावयाचे आहेत त्या खेळांच्या अधिकृत राज्य संघटनांच्या याद्या जिल्हा क्रीडा अधिकारी व विभागीय मंडळांना दिनांक १ मे पर्यंत कळवाव्यात. तसेच आपल्या वेबसाईटवर प्रसिध्दिस द्याव्यात. (एकविध खेळाची अधिकृत राज्य संघटना ठरविण्यासाठी राज्य संघटनांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये देण्यात आली आहे.)

(१४) जिल्हा संघटनेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरिय क्रीडा स्पर्धांमध्ये सांघिक क्रीडा प्रकारामध्ये कमीत कमी ८ संघ वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये प्रत्येक बाबीत कमीत कमी ८ खेळाडू सहभागी होणे आवश्यक आहे. तसेच सहभागी झालेल्या खेळाडूंची नोंदणी जिल्हा स्तरावर होणे आवश्यक आहे. सदर नियम राज्यस्तर स्पर्धेसाठीही लागू करण्यात यावा.

(१५) राज्य संघटनांनी जिल्हा, विभाग व राज्यस्तर स्पर्धांचे प्रमाणपत्र वाटप करताना प्रमाणपत्रांची रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

(१६) राज्य संघटनांनी स्पर्धेच्या प्रत्येक प्रमाणपत्रावर अनुक्रमांक, संघटनेचा नोंदणी क्रमांक, दिनांक, राज्यस्तरीय कितवी स्पर्धा आहे, स्पर्धेचा कालावधी, स्थळ याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्रामध्ये खेळाडूंचे वयोगटाचा उल्लेख आवश्यक आहे.

(१७) प्रत्येक वर्षी एक वयोगटातील एकच स्पर्धा ग्राह्य धरण्यात येईल. निमंत्रित क्रीडा स्पर्धा ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(१८) राज्य व राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धांच्या प्रमाणपत्रावर अध्यक्ष व सचिव यांच्यापैकी एकाची शाईची स्वाक्षरी अनिवार्य आहे

(१९) राज्य संघटनांनी ज्या जिल्हामध्ये जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील स्पर्धांचे आयोजन केले असेल त्या स्पर्धांसाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना व राष्ट्रीयस्पर्धेसाठी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना निरिक्षक म्हणून उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

(२०) जिल्हा, राज्य संघटनांनी जिल्हास्तरीय स्पर्धा, राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा इ. सर्व स्पर्धांचा वार्षिक कार्यक्रम निश्चित करुन त्याची प्रत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक संचालनालयास वर्षाच्या सुरुवातीला कळवावी.

(२१) राज्य संघटनांनी सर्व स्तरावरील स्पर्धांचे अभिलेख कायमस्वरुपी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

(२२) क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वरील निकषांव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विहित केल्यानुसार खालील निकषांचाही यामध्ये अंतर्भाव करण्यात येत आहे :-

अ) १) वाढीव क्रीडा गुण सवलतीचे गुण खेळाडू विद्यार्थी अनुत्तिर्ण होत असल्यास उत्तीर्ण होण्यास जितके गुण कमी पडत असतील तितके अनुज्ञेय असलेल्या गुण विभागणी प्रमाणे गुण एक किंवा सर्व विषयात कमाल मर्यादेत विभागून द्यावेत. उर्वरीत शिल्लक गुण संबंधित खेळाडू विद्यार्थ्यांच्या एकूण टक्केवारीमध्ये जमा करण्यात यावे.

२) उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेले गुण एकूणात प्रचलित पद्धतीनुसार दर्शविण्यात यावेत.

ब) राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य संपादन केलेल्या खेळाडूंना क्रीडा गुण देताना चालू शैक्षणिक वर्षातील इ. १० वी व १२ वी साठी १ जून ते २८/२९ फेब्रुवारी हा कालावधी ग्राह्य धरण्यात यावा.

क) राज्य संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येणा-या स्पर्धांचे आयोजन जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीयस्तर या क्रमाने झाले असेल तरच क्रीडा गुण सवलत देण्यात यावी.

(२३) सदर सवलत ही नियमित विद्यार्थी यांना लागू राहील.

(२४) क्रीडा धोरण समितीच्या शिफारशीनुसार शासनाच्या वतीने आयोजित भारतीय शालेय खेल महासंघ, भारतीय खेल प्राधिकरण पुरस्कृत आयोजित करण्यात येणा-या स्पर्धेकरिता खालीलप्रमाणे वाढीव क्रीडा गुण सवलत अनुज्ञेय राहील-

अ) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय/ग्रामीण/महिला/इतर क्रीडा स्पर्धेत, आंतरराष्ट्रीयस्पर्धेत सहभाग घेतलेल्या, प्राविण्य मिळविलेल्या व राष्ट्रीयक्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडू विद्यार्थ्याला वाढीव २५ क्रीडा गुण देण्यात यावेत.

ब) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय/ग्रामीण/महिला/इतर राष्ट्रीयक्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य प्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव २० क्रीडा गुण देण्यात यावेत.

क) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय/ग्रामीण/महिला/ इतर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव १५ क्रीडा गुण देण्यात यावेत.

(२५) क्रीडा धोरण समितीच्या शिफारशीनुसार मान्यता प्राप्त एकविध खेळ क्रीडा संघटनाद्वारे आयोजित करण्यात येणा-या सांघिक/वैयक्तिक खेळांच्या क्रीडा स्पर्धेकरिता खालीलप्रमाणे वाढीव क्रीडा गुण सवलत अनुज्ञेय राहील-

अ) संघटनेच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीयक्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव २५ क्रीडा गुण देण्यात यावेत..

ब) संघटनेच्या अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव २० क्रीडा गुण देण्यात यावेत.

क) संघटनेच्या अधिकृत राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव १५ क्रीडा गुण देण्यात यावेत.

(२६) क्रीडा धोरण समितीच्या शिफारशीनुसार अनुज्ञेय क्रीडा गुणांची सवलत खालीलप्रमाणे-

अ) इयत्ता ९ वी व ११ वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांनादेखील वरीलप्रमाणे क्रीडा गुण सवलत देण्यात यावी. याविषयीचा प्रस्ताव संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने प्रमाणित करुन शाळेकडे पाठवावा.

ब) इयत्ता १ ली ते ८ वीच्या शारिरीक शिक्षण परीक्षेत जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीयस्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थी खेळाडूंना अनुक्रमे २५, ५०, ७५, १०० अधिक गुण देण्यात यावे. सदरील गुण विषयाच्या एकूण गुणाच्या बेरजेत धरावेत. तथापि गुणांची सरासरी १००% पेक्षा जास्त होऊ नये.

(२७) वरील अटींमध्ये बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

शासन निर्णय क्रमांक :- एसएससी-२०१२/(१५४/१२)/उमाशि-२
दिनांक :- २१ एप्रिल, २०१५ सोबतचे

**परिशिष्ट "ब"**

(एकविध खेळाच्या राज्य/जिल्हा संघटनेने संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांना सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी).

१. जिल्हा संघटनेचे धर्मदाय आयुक्त यांचेकडे संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र.
२. राज्य संघटनेस जिल्हा संघटना संलग्न असल्याबाबतचे पत्र.
३. जिल्हा संघटनेच्या घटनेची प्रत.
४. जिल्हास्तर/विभागस्तर क्रीडा स्पर्धेचा संपूर्ण अहवाल.
५. जिल्हा संघटनेच्या गतवर्षाच्या लेखाविवरण पत्राची स्वाक्षरित प्रत.
६. जिल्हा संघटनेच्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची स्वाक्षरित प्रत.
७. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे परिपत्रक.
८. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंची प्रवेशिका.
९. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांची भाग्यपत्रिका.(Lots)
१०. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे गुणपत्रक (सांघिक खेळ).
११. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा वजनगटनिहाय वजन घेतलेबाबत खेळाडूंची स्वाक्षरी असलेला तक्ता व भाग्यपत्रिका (वैयक्तिक खेळ).
१२. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲथलेटिक्स व जलतरण स्पर्धांची बाबनिहाय कार्यक्रमपत्रिका.
१३. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे अंतिम निकालपत्र.
१४. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांत सहभागी झालेल्या खेळाडूंच्या याद्या सोबतच्या विहित नमुन्यात (परिशिष्ट "इ") दोन प्रतीत. राज्य संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांची शाईची स्वाक्षरी व शिक्का असलेली प्रत.
१५. राज्य संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांच्या शाईच्या नमुना स्वाक्षरीचे पत्र.

शासन निर्णय क्रमांक :- एसएससी-२०१२/(१५४/१२)/उमाशि-२

दिनांक :- २१ एप्रिल, २०१५ सोबतचे

**परिशिष्ट "क"**

(एकविध खेळाची अधिकृत राज्यसंघटना ठरविण्यासाठी राज्यसंघटनांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी.)

१. राज्यसंघटनेने धर्मदाय आयुक्त यांचेकडून संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र.

२. राज्यसंघटनेस महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता/संलग्नता असलेबाबतचे पत्र.

३. राज्यसंघटनेस त्यांच्या संबंधित एकविध खेळाच्या राष्ट्रीयसंघटनेची मान्यता/संलग्नता असलेबाबतचे पत्र तसेच त्या राष्ट्रीयसंघटनेस केंद्र शासनाची मान्यता/इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनची मान्यता/संलग्नता असल्याबाबतच्या पत्राची प्रत.

४. जी राज्यसंघटना महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व एकविध खेळाच्या राष्ट्रीयसंघटनेस संलग्न आहे, तीच राष्ट्रीयसंघटना इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनला संलग्न असणे आवश्यक आहे.

५. राज्यसंघटनेस किमान ७५ टक्के महसूली जिल्ह्याप्रमाणे जिल्हासंघटना संलग्न असणे आवश्यक आहे. सदर जिल्हा संघटनांची संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनिमय, १९५० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र.

६. राज्यसंघटनेस संलग्न असलेल्या जिल्हा संघटनांची यादी.

७. राज्यसंघटनेच्या अद्ययावत पदाधिका-यांच्या यादीला, धर्मदाय आयुक्त यांनी मान्यता दिलेली अथवा त्यांच्या दस्तऐवजामध्ये बदल केलेली प्रत.

८. राज्यसंघटनांचे अध्यक्ष व सचिव यांची नावे त्यांच्या नमुना स्वाक्षरीचे पत्र.

९. राज्यसंघटनेच्या घटनेची प्रत.

१०. राज्यसंघटनेच्या खेळाच्या क्रीडा स्पर्धा आयोजनाच्या नियमावलीची प्रत.

११. राज्य संघटनेच्या गतवर्षाच्या लेखा विवरण पत्राची स्वाक्षरित प्रत.

१२. राज्य संघटनेच्या गतवर्षातील सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताची स्वाक्षरित प्रत.

## परिशिष्ट "ड"

भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत शालेय क्रीडा स्पर्धांमधील खेळ :

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | ॲथलेटिक्स |
| २ | आर्चरी |
| ३ | बॅडमिंटन |
| ४ | बास्केटबॉल |
| ५ | बॉक्सिंग |
| ६ | बेसबॉल |
| ७ | बुद्धिबळ |
| ८ | क्रिकेट |
| ९ | क्रिकेट विनू मंकड |
| १० | क्रिकेट सी. के. नायडू |
| ११ | सायकलिंग रोडरेस |
| १२ | फूटबॉल |
| १३ | तलवारबाजी |
| १४ | जिम्नॅस्टिक्स् |
| १५ | हॉकी |
| १६ | हॅण्डबॉल |
| १७ | ज्युदो |
| १८ | कबड्डी |
| १९ | खो-खो |
| २० | लॉनटेनिस |
| २१ | नेटबॉल |
| २२ | रोलर स्केटिंग क्वॉड व इनलाइन |
| २३ | रोलर हॉकी |
| २४ | रोलबॉल |
| २५ | रायफल शूटिंग |
| २६ | जलतरण, डायव्हिंग व वॉटरपोलो |
| २७ | सॉफ्टबॉल |
| २८ | टेबलटेनिस |
| २९ | तायक्वांदो |
| ३० | व्हॉलीबॉल |
| ३१ | कुस्ती |
| ३२ | वेटलिफ्टिंग |
| ३३ | योगा |
| ३४ | सुब्रतो कप फूटबॉल |
| ३५ | नेहरु कप हॉकी |
| ३६ | मल्लखांब |

| | |
|---|---|
| ३७ | बॉलबॅडमिंटन |
| ३८ | कॅरम |
| ३९ | डॉजबॉल |
| ४० | किकबॉक्सिंग |
| ४१ | सिकई मार्शल आर्ट |
| ४२ | थ्रोबॉल |

भारतीय क्रीडा प्राधिकरण पुरस्कृत ग्रामीण राजीव गांधी खेल अभियान या क्रीडा स्पर्धांचे खेळ :

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | ग्रामीण गट क्र. १ - ॲथलेटिक्स<br>तायक्वाँदो<br>व्हॉलीबॉल |
| २ | ग्रामीण गट क्र. २ - कबड्डी<br>खो-खो |
| ३ | ग्रामीण गट क्र. ३ - फूटबॉल<br>वेटलिफ्टिंग |
| ४ | ग्रामीण गट क्र. ४ - धनुर्विद्या |
| ५ | ग्रामीण गट क्र. ५ - कुस्ती |

भारतीय क्रीडा प्राधिकरण पुरस्कृत महिला/राजीव गांधी खेळ अभियान (RGKA) क्रीडा स्पर्धांचे खेळ :

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | महिला गट क्र. १ - बास्केटबॉल<br>जलतरण<br>जिम्नॅस्टिक्स् |
| २ | महिला गट क्र. २ - हॅण्डबॉल<br>हॉकी<br>टेनिस |
| ३ | महिला गट क्र. ३ - ॲथलेटिक्स<br>बॅडमिंटन<br>टेबल-टेनिस |
| ४ | महिला गट क्र. ४ - कबड्डी<br>खो-खो<br>व्हॉलीबॉल |

ऑल इंडिया स्पोर्टस कौन्सिल फॉर दि डेफच्या क्रीडा स्पर्धांचे खेळ :

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | मैदानी |
| २ | बॅडमिंटन |
| ३ | बास्केटबॉल |
| ४ | क्रिकेट |
| ५ | फूटबॉल |

| | |
|---|---|
| ६ | जलतरण |
| ७ | टेबल-टेनिस |
| ८ | व्हॉलीबॉल |
| ९ | कुस्ती |

पॅरा ऑलिम्पिक कमिटी ऑफ इंडियाच्या क्रीडा स्पर्धांचे खेळ :

| **अ.क्र.** | **खेळ** |
|---|---|
| १ | मैदानी |
| २ | धर्नुविद्या |
| ३ | सिटींग व्हॉलीबॉल |
| ४ | पॉवरलिफ्टिंग |
| ५ | रायफल शूटिंग |
| ६ | जलतरण |
| ७ | टेबल-टेनिस |
| ८ | व्हिल चेअर फेन्सिंग |

## परिशिष्ट “इ”

राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीयक्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठी खेळाडू विद्यार्थ्यांची यादी.

(वैयक्तिक स्पर्धेसाठी विहीत नमुना)

स्पर्धेचे नांव :-

स्पर्धेचा कालावधी :-

स्पर्धेचे ठिकाण :-

जिल्ह्याचे नांव :-

| अ. क्र. | खेळाचे नांव/प्रकार वजन गट | खेळाडूचे नांव | जन्मतारीख | वयोगट | इयत्ता | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

राज्य/राष्ट्रिय/आंतरराष्ट्रीयक्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठी खेळाडू विद्यार्थ्यांची यादी.

(सांघिक स्पर्धेसाठी विहीत नमुना)

स्पर्धेचे नांव :-

स्पर्धेचा कालावधी :-

स्पर्धेचे ठिकाण :-

जिल्ह्याचे नांव :-

| अ. क्र. | खेळाचे नांव | खेळाडूचे नांव | जन्मतारीख | वयोगट | इयत्ता | शाळेचे नांव | प्राविण्य/ सहभाग | प्रमाणपत्र क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील रकान्यात नमूद केलेल्या खेळाडूंनी संघटनेने आयोजित केलेल्या अधिकृत राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेला असून सदरील माहिती खरी आहे. खोटी माहिती असल्याचे निर्दशनास आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संघटनेची राहील.

स्वाक्षरी :-

सचिव/अध्यक्ष :-

शिक्का